(२६४) प्रति ३९३
सांकेतांक क्र 20170907२२
NO2017090722
२८८

RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ३, अंक ४५(३)] गुरुवार, सप्टेंबर ७, २०१७/भाद्र १६, शके १९३९ [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

### असाधारण क्रमांक ८९

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५८.— महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम. | १-२ |

दिनांक ६ सप्टेंबर २०१७ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

नि. ज. जमादार,
प्रधान सचिव व विधि परामर्शी,
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

### सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५८.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक ७ सप्टेंबर २०१७ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

### महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.

१९४७ चा ६२. ज्याअर्थी, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या, अडुसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. या अधिनियमास, महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, २०१७, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.



S-2019

(२५९) ~~रू~~-३९४ २६० 

सन १९४७ चा अधिनियम क्रमांक ६२ याच्या कलम ९ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम याच्या कलम ९ मध्ये, पोट-कलम (३) नंतर, पुढील परंतुके व स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात येतील :— १९४७ चा ६२.

" परंतु, कलम ३१ मध्ये अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, जिल्हाधिकाऱ्यास, यासंबंधात केलेल्या अर्जावरून, १५ नोव्हेंबर १९६५ रोजी किंवा त्यानंतर आणि महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, २०१७ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, या अधिनियमाच्या तरतुदींच्या विरुद्ध केलेले कोणत्याही जमिनीचे हस्तांतरण किंवा विभाजन हे, जर अशा जमिनीचे, प्रचलित प्रारूप किंवा अंतिम प्रादेशिक योजनेमध्ये निवासी, वाणिज्यिक, औद्योगिक, सार्वजनिक किंवा निमसार्वजनिक किंवा कोणत्याही अकृषिक वापराकरिता नियतवाटप केले असेल किंवा अशी जमीन, कोणत्याही खऱ्याखुऱ्या अकृषिक वापराकरिता वापरण्याचे उद्देशित केले असेल तर, वार्षिक दर विवरणपत्रानुसार, अशा जमिनीच्या बाजारमुल्याच्या २५ टक्क्यांपेक्षा अधिक नसेल अशा शासन राजपत्रात वेळोवेळी अधिसूचित करील अशा प्रमाणातील नियमाधीनकरण अधिमूल्य प्रदान करण्याच्या अधीन राहून, नियमाधीन करता येईल : २०१७ चा महा. ५८.

परंतु आणखी असे की, कलम ३१ मध्ये अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, या अधिनियमाच्या तरतुदींविरुद्ध केलेला जमिनीचा हस्तांतरणाचा किंवा विभाजनाचा व्यवहार, जर जी जमीन कोणत्याही खऱ्याखुऱ्या अकृषिक वापराकरिता वापरली जाईल या कारणावरून नियमाधीन केली असेल तेव्हा तो, नियमाधीन केल्याच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीमध्ये अशा खऱ्याखुऱ्या अकृषिक वापरास सुरूवात न केल्याच्या परिणामी, अशी जमीन जिल्हाधिकारी सरकारजमा करील. त्यानंतर अशी जमीन प्रथमतः तिला लागून असलेल्या शेजारच्या भूमापन क्रमांकाच्या किंवा त्या भूमापन क्रमांकाच्या मान्यताप्राप्त पोट-विभागणीच्या धारकाला किंवा भोगवटादाराला, प्रचलित वार्षिक दर विवरणपत्रानुसार, अशा जमिनीच्या बाजारमूल्याच्या ५० टक्के इतक्या रकमेचे प्रदान केल्यावर देऊ करील आणि अशा प्रकारे गोळा केलेल्या रकमेच्या तीन-चतुर्थांश इतकी रक्कम ज्या कोणा व्यक्तीकडून अशी जमीन शासनाकडे सरकारजमा केली होती त्या कसूरदार व्यक्तीला प्रदान करण्यात येईल आणि अशा प्रकारे गोळा केलेल्या रकमेच्या उर्वरित एक-चतुर्थांश इतकी रक्कम शासनाच्या खात्यात जमा करण्यात येईल. जर अशा लागून असलेल्या शेजारच्या भूमापन क्रमांकाच्या किंवा त्या भूमापन क्रमांकाच्या मान्यताप्राप्त पोट-विभागणीच्या भोगवटादाराने, तो तुकडा खरेदी करण्यास नकार दिलेला असेल त्याबाबतीत, त्या तुकड्याचा राज्य शासनाकडून लिलाव करण्यात येईल आणि त्यातून आलेले उत्पन्न, कसूरदार व्यक्ती आणि शासन यांच्यामध्ये ३ : १ या प्रमाणात वाटून घेण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**—या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ, " वार्षिक दर विवरणपत्र " या शब्दप्रयोगाचा अर्थ, ज्या चालू वर्षात जिल्हाधिकाऱ्याकडून नियमाधीन करण्याचा आदेश देण्यात आला असेल किंवा ज्या वर्षात असे अधिमूल्याचे प्रदान करण्यात आले असेल, यांपैकी जे नंतरचे असेल त्या वर्षांच्या संबंधात मुंबई मुद्रांक (मालमत्तेचे खरे बाजारमूल्य ठरविणे) नियम, १९९५ किंवा यासंबंधात त्यावेळी अंमलात असलेले इतर कोणतेही नियम यांच्या तरतुदींन्वये प्रसिद्ध केलेले वार्षिक दराचे विवरणपत्र, असा आहे.".

S-220

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD. MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

(२६३) २०९
~~३९९~~ २१
~~२००~~

ई-मेलने                महाराष्ट्र शासन


क्र.संकीर्ण-२०१६/ प्र.क्र.३४७/ल-१
महसूल व वन विभाग, मुख्य इमारत,
पहिला मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई- ४०० ०३२

दिनांक- २६ ऑक्टोबर, २०१७

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त,
जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य), पुणे
सर्व जिल्हाधिकारी / अप्पर जिल्हाधिकारी
सर्व उपविभागीय अधिकारी / तहसिलदार

**विषय** :- महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५८ अर्थात, "महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, २०१७", महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये दिनांक ७ सप्टेंबर, २०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर शासन राजपत्राची मराठी व इंग्रजी भाषेतील प्रत माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे.

महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, २०१७, मधील तरतूदीन्वये आकारावयाच्या नियमाधीकरण अधिमूल्याचा दर निश्चित करण्याबाबतची कार्यवाही शासनस्तरावर सुरु असून त्याबाबतची अधिसूचना प्रसिध्द झाल्यानंतर आपणास स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

सहपत्र : वरील प्रमाणे

(विलास थोरात)
**अवर सचिव**

प्रत :-

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
२. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव
३. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव
४. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
६. प्रधान सचिव (महसूल) यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, मंत्रालय, मुंबई
७. सर्व सह सचिव / उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. ज समूहातील सर्व कार्यासने, कार्यासन म-१, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. निवडनस्ती- ल-१